क्र.का.४/प्र.क्र.६१७/२०११(भाग-१)/१३/२८०७
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- ३०/११/१३.

**विषय :-** संमती पत्र (Confirmation Deed) किंवा घोषणापत्र(Declaration Deed) च्या नोंदणीबाबत.

**संदर्भ :-** १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.४/प्र.क्र. ६१७/११/३००८, दि.२२/१२/२०११.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.क्र.का.४/प्र.क्र.६१७/११/१२/११६८, दि.२८/०५/२०१२.

सुधारित परिपत्रक :

ज्याअर्थी, नोंदणी अधिनियम, १९०८ मधील, दस्त नोंदणीसाठीच्या मुदतीच्या तरतुदीच्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक सूचना संदर्भित क्र.१ च्या परिपत्रकाद्वारे निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच त्याअनुषंगाने उपस्थित शंका/आक्षेपांबाबत सविस्तर खुलासा संदर्भ क्र.२ चे पत्राद्वारे करण्यात आला आहे,

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.२ चे पत्राद्वारे करण्यात आलेल्या मुद्देनिहाय खुलाशाचे पार्श्वभूमीवर व संदर्भ क्र.१ चे परिपत्रकातील सूचना अधिक स्पष्ट व्हावी या उद्देशाने संदर्भ क्र.१ चे परिपत्रकातील उक्त सूचना सुधारित करणे आवश्यक आहे, असे निम्नस्वाक्षरीकार यांचे मत झाले आहे,

त्याअर्थी, संदर्भ क्र.१ चे परिपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे –

नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक का.४/प्र.क्र.६१७/११/३००८, दिनांक २२/१२/२०११ मधील पृष्ठ क्र.३ वरील अंतिम परिच्छेदातील ***"मात्र अशा प्रकरणांमध्ये प्रचलित बाजारमुल्यांकनानुसार मुद्रांक शुल्क भरुन, खरेदीखताचा दस्तऐवज संबंधित पक्षकार निष्पादित करुन, तो नोंदणीसाठी सादर करु शकतात, त्या खरेदीखताची इतर कायदेशिर तरतुदींची पुर्तता होत असल्यास नोंदणी करण्यास हरकत नाही"*** या मजकुराऐवजी पुढील मजकूर वाचण्यात यावा.

१८५५
१२।२०१३

*" मात्र अशा प्रकरणांमध्ये, मूळ व्यवहाराच्या पुर्ततेसाठी/ पुरावा म्हणून संबंधित कायद्यानुसार विधीग्राहय असलेला नवीन दस्तऐवज त्या व्यवहाराच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेल्या सर्व पक्षकारांनी स्वत: किंवा विहित पध्दतीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे निष्पादित केला असेल व त्यास महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये यथोचित मुद्रांक शुल्क दिले असेल, आणि त्याच्या निष्पादनापासून नोंदणी*

*अधिनियम १९०८ मधील  कलम २३,२४ व २५ नुसार विहित मुदतीत नोंदणीसाठी सादर करण्यात आला असेल तर इतर कायदेशिर तरतुदींची पुर्तता होत असल्यास उक्त नवीन दस्तऐवज नोंदणीस स्विकारण्यास हरकत नाही* ”.

सही/- (एस्.चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रति, सर्व दुय्यम निबंधक (संबंधित सह जिल्हा निबंधक यांचेमार्फत).

प्रत :-१. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
२.उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
४. दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई शहर / उपनगर.
५. सर्व सह जिल्हा निबंधक.
६. सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता.